Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,
Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2021: 7.278, www.srjis.com
PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, FEB-MAR, 2022, VOL-10/50

# शासकीय आदिवासी वसतीगृह योजनेचा चिकित्सक अभ्यास

**कैलाश भीमराव पुपलवाड**

*संशोधक, वरिष्ठ लघुलेखक, परिक्षा विभाग*

*स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.*

**Paper Received On:** 25 MAR 2022
**Peer Reviewed On:** 31 MAR 2022
**Published On:** 1 APR 2022

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

शिक्षण हे सामाजिक विकास व परिवर्तनाचे महत्वपूर्ण साधन आहे. भारतीय समाजात ज्याठिकाणी समाजाची विविध जाती, धर्म, वंशाच्या आधारे विविध सामाजिक स्तरात विभागणी झालेली होती. जातीय स्तरीकरणात विशिष्ट जातीच्या वर्गाला मूलभूत अधिकारांपासून वंचित ठेवले होते तर विशिष्ट वर्गाला विशेष अधिकार प्रदान करण्यात आले होते. आदिवासी समाज हा वंचित घटकातील एक वर्ग आहे. आपल्या अलिप्ततावादी धोरणामुळे हा समाज वंचित व मागास राहीलेला होता. भारताने स्वातंत्र्योत्तर काळात समता, स्वातंत्र्य, बंधूता व न्याय या चतू:सूत्रीवर आधारीत समाजवादी लोकशाही शासन प्रणाली स्वीकारली असल्यामुळे समाजातील सर्वच घटकांना सोबत घेऊन त्यांना विकासाच्या समान संधी प्रदान करण्यावर भर देण्यात आला. भारतात आदिवासींची लोकसंख्या १०.४२ कोटीच्या वर असून एकूण लोकसंख्येशी त्यांचे प्रमाण ८.६ टक्के इतके आहे.[१] आदिवासी समाज हा सामाजिक—आर्थिक, शैक्षणिक दृष्टीने मागासलेला आहे. समाजवादी लोकशाही शासन प्रणालीत समाजातील सर्वांना समान अधिकार व समान विकासाच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांचा विकास करण्याची जबाबदारी शासनाची असते व शासनही त्यादिशेने प्रयत्नशील असलेले दिसते. भारत सरकारने अकराव्या पंचवार्षिक योजनेपासून समावेशक विकासाचे ध्येय समोर ठेवले असून त्यातून समावेशी समाज निर्मितीचे लक्ष्य गाठणे हे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आलेले आहे. शिक्षण हे समावेशी समाज निर्मितीचे महत्वपूर्ण साधन असून अनेक शैक्षणिक योजनांच्या माध्यमातून सर्वसमावेशक शिक्षण सर्वांना उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर आहे.'समावेशी शिक्षणात सर्वांना शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी

प्रत्येकाच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना मुख्य शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी संधी, सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. मग त्या संधी अभ्यासक्रमाच्या संदर्भात किंवा तो शिकविण्याच्या संदर्भात वा त्यांना विशेष सुविधा उपलब्ध करून देण्याच्या संदर्भात असू शकतात.[२]

शासनातर्फे आदिवासींच्या शैक्षणिक विकासासाठी विविध योजना राबविल्या जातात. त्यात शालांत शिष्यवृत्ती तसेच मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, पुस्तकपेढी, निवासी आश्रमशाळा, व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या मुलांना निर्वाह भत्ता व आदिवासी मुला—मुलींसाठी शासकीय वसतीगृह योजना वगैरे. अशा विविध योजनांमुळे आदिवासी मुलांना फायदा झाला असला तरी त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक मागासलेपण पूर्णपणे दूर होवू शकले नाही. अशा शैक्षणिक योजनांपैकी शासकीय आदिवासी वसतीगृह योजनेचा चिकित्सक अभ्यास सदर संशोधन निबंधात करण्यात आलेला आहे.

**संशोधनाचे उद्देश**

१. आदिवासी जमातीच्या शैक्षणिक स्थितीचे अवलोकन करणे.

२. शासकीय आदिवासी वसतीगृह योजनेचे स्वरूप स्पष्ट करणे.

३. महाराष्ट्रातील शासकीय आदिवासी वसतीगृह योजनेचा आढावा घेणे.

**अनुसूचित जमातीची शैक्षणिक स्थिती**

भारत सरकारद्वारे आदिवासी समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी विविध योजना राबविल्या जात असल्या तरीही त्यांची शैक्षणिक स्थिती अतिशय दयनिय आहे. आदिवासी समाजाचे उच्च शिक्षणातील तसेच तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणातील प्रमाण अत्यल्प आहे. आतापर्यंत आदिवासी शिक्षणावर मोठया प्रमाणात अध्ययने झाली आहेत त्यांच्या सर्वसाधारण निष्कर्षानुसार आदिवासींच्या निम्न शैक्षणिक स्थितीसाठी त्यांची सामाजिक—सांस्कृतिक वैशिष्ट्येच कारणीभूत आहेत.

आदिवासी समाज हा निरक्षर समाज मानला जातो. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील आदिवासी समाजाचा साक्षरता दर हा ५९% इतका होता जो एकूण राष्ट्रीय साक्षरता दरापेक्षा (७३%) खूपच कमी होता. एकूणच आदिवासी समाजात शैक्षणिक सोयी सुविधांच्या अभावी त्यांचा साक्षरता दर हा निम्न असल्याचे आपल्याला म्हणता येईल. याशिवाय आदिवासी समाजात शैक्षणिक गळतीचे प्रमाणही अधिक आहे. आदिवासी क्षेत्रातील शैक्षणिक सोयी सुविधांची कमतरता व आदिवासी कुटुंबातील शैक्षणिक वातावरणाचा अभाव यामुळे अनेक आदिवासी मुले प्राथमिक स्तरावरच तर काही माध्यमिक स्तरावर शाळा सोडतात व कुटुंबाच्या अर्थार्जनात हातभार लावतात. थोडक्यात आदिवासी समाजात शाळा गळतीचे प्रमाण अधिक असून खूपच थोडे मुले उच्च

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

शिक्षणापर्यंत पोहोचतात. खालील तक्त्यात आदिवासी मुलांचे शैक्षणिक स्तरानुसार शैक्षणिक गळतीचे प्रमाण दर्शविले आहे.

**तक्ता क्र. ०१**

**अनुसूचित जमातीचे शैक्षणिक गळतीचे प्रमाण**[३]

| शैक्षणिक स्तर वर्ष | प्राथमिक | | उच्च प्राथमिक | | माध्यमिक | | उच्च माध्यमिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| २०१४—१५ | ७.९७ | ७.९८ | ८.०३ | ८.८५ | २७.४२ | २६.९६ | ३.०९ | २.७७ |
| २०१५—१६ | ७.०२ | ६.८४ | ८.४८ | ८.७१ | २४.९४ | २४.४० | — | — |
| २०१६—१७ | ८.५७ | ८.५१ | ९.४६ | ९.७० | २७.४१ | २६.५१ | ८.९४ | ७.८७ |

आदिवासी कल्याण व विकास मंत्रालय भारत सरकारद्वारे प्रसिध्द वार्षिक अहवाल २०२०—२१ नुसार माध्यमिक स्तरावर मुलांचे शैक्षणिक गळतीचे प्रमाण सर्वाधिक आहे. सर्वच स्तरावर मुलांचे गळतीचे प्रमाण आहे. मात्र माध्यमिक स्तरावर सर्वाधिक मुले शिक्षणातून बाहेर पडतात. आदिवासी भागात शैक्षणिक सुविधांचा अभाव या शैक्षणिक गळतीसाठी कारणीभूत आहे. कारण माध्यमिक आणि उच्च शिक्षणासाठी या मुलांना आपले गाव, तांडा, वाडी, वस्ती सोडावे लागते. उच्च शिक्षणाची सुविधा शहरात उपलब्ध असते. शहरात राहण्याचा खर्च आदिवासी लोकांना परवडणारा नसतो. त्यामुळे मध्येच शाळा सोडून देणाऱ्यांचे प्रमाण सर्वच स्तरावर असलेले दिसून येते. अगदी थोडीच आदिवासी मुले उच्च शिक्षणापर्यंत पोहोचतात.

आदिवासी मुलांच्या शैक्षणिक गळतीसाठी अनेक कारण जबाबदार आहेत. त्यात आदिवासी पालकांचा शिक्षणाविषयी असलेला उदासिन दृष्टिकोन, पालकांची व्यसनाधीनता, शैक्षणिक सुविधांचा अभाव वगैर. आदिवासींचा शिक्षणातील प्रमाण वाढविण्यासाठी शिक्षणाचा आदिवासींच्या उदरनिर्वाहाच्या गरजांशी मेळ घालता आला पाहिजे. याशिवाय आदिवासींमधील असलेले कमालीचे दारिद्रय त्यांना शिक्षण सोडून कुटुंबाच्या अर्थार्जनात हातभार लावण्यास भाग पाडते. आदिवासी विकास विभागाचा वार्षिक अहवाल २०२०—२१ नुसार राष्ट्रीय पातळीवर ग्रामीण भागात ४५.३ टक्के तर नागरी भागात २४.१ टक्के आदिवासी दारिद्रय रेषेखाली जीवन जगतात.[४] ज्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाच्याच गरजा पूर्ण होत नसतील ते शिक्षणावर काय खर्च करणार? परिणामी मुले शाळा सोडून कुटुंबाला आर्थिक सहकार्य करतात. त्यामुळे शासनाने आदिवासींसाठी आखलेल्या शैक्षणिक योजना आदिवासींसाठी आशेचा किरण ठरतात. कारण त्याचा लाभ घेऊन आज काही प्रमाणात का होईना आदिवासी उच्च शिक्षणापर्यंत पोहोचू लागला आहे. शासकीय आदिवासी वसतीगृहांमुळे आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शहरात राहण्याची सोय झाली आहे. शासकीय

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

वसतीगृहाची योजना ही आदिवासींच्या शैक्षणिक विकासासाठी व त्यांच्या शैक्षणिक समावेशनासाठी महत्वपूर्ण ठरली आहे.

**शासकीय आदिवासी वसतीगृह योजना**

अनुसूचित जमातीच्या मुला—मुलींना उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ही योजना महत्वपूर्ण ठरते आहे. अनुसूचित जमातीच्या मुलां/मुलींना उच्च शिक्षणाची सोय व्हावी व त्यांची शैक्षणिक उन्नती व्हावी या उद्‌देशाने आदिवासी विकास विभागामार्फत शासकीय वसतिगृह ही योजना राबविण्यात येते. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार वसतिगृहात प्रवेश देण्यात येतो. यामध्ये प्रवेशित मुलां/मुलींना मोफत भोजन, निवास, स्टेशनरी साहित्य, क्रमिक पाठ्यपुस्तके, वाचन साहित्य, निर्वाह भत्ता, शालेय साहित्य यासाठी डायरेक्ट बॅक ट्रान्सफरद्वारे विद्यार्थ्यांच्या खात्यावर रक्कम जमा केली जाते. सदर सुविधा शासनामार्फत पुरविली जाते. वसतीगृहात विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करून गुणवत्तेनुसार प्रवेश निश्चित करावा लागतो.

आदिवासी वसतीगृह योजना सुरूवातीला केवळ आदिवासी मुलींसाठी सुरू करण्यात आली होती. केंद्रशासनाने तिसऱ्या पंचवार्षिक योजना काळात आदिवासी मुलींच्या शैक्षणिक विकासासाठी ही योजना सुरू केली होती. आदिवासी स्त्रियांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक असून लहान वयातच घरगुती जबाबदाऱ्या मुलींकडे येतात. तिला आई—वडिलांना घरकामात मदत करावी लागते, लहान भावंडांना सांभाळावे लागते त्याचा परिणाम आदिवासी मुलींच्या शिक्षणावर होतो. आदिवासी मुलींसाठी वसतीगृहाच्या माध्यमातून त्यांना कौटुंबिक जबाबदाऱ्यांपासून मुक्त अशा शैक्षणिक वातावरणात राहण्याची संधी दिली जाते. मुलांसाठी सन १९८९—९० पासून ही योजना सुरू करण्यात आली. आदिवासी मुलांसाठीही शासकीय वसतीगृह योजना राबवीली जाते. दहाव्या पंचवार्षिक योजनेपासून या दोन्ही योजना एकत्रितपणे राबविल्या जात आहेत.

**वसतीगृह योजनेची उद्दिष्टे**[५]

१. आदिवासी मुला—मुलींना शिक्षण प्रक्रियेत टिकवून ठेवणे. आदिवासी भागात शैक्षणिक सुविधा कमी असतात, विरळ लोकवस्ती असल्याने सर्वच ठिकाणी शाळा महाविद्यालये उभारणे शासनाला शक्य होत नाही परिणामी आदिवासी मुलांना शाळा महाविद्यालय लांब असल्याने शिक्षण सोडावे लागते तर काही पालकांना आर्थिक परिस्थितीमुळे आपल्या पाल्यांना शाळेत पाठविणे शक्य होत नाही. अशा मुलांना वसतीगृहात मोफत प्रवेश दिल्याने त्यांना उर्वरित शिक्षण पूर्ण करणे शक्य होते.

२. माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या सोयी सुविधा असलेल्या ठिकाणी वसतीगृहांची निर्मिती करून आदिवासी मुलांना हे सर्व शिक्षण उपलब्ध करून दिले जाते.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

३. आदिवासी मुलांच्या शारीरिक तंदुरूस्तीसाठीही वसतीगृह योजना उपयुक्त ठरते. वसतीगृहातील प्रवेशीत मुलांना सकस आहार पुरविला जातो शिवाय त्यांच्या आरोग्याची काळजीही घेतली जाते. वसतीगृहात सर्वांच्या सोबत राहिल्याने त्यांच्यात समूहभावना जागृत होण्यास मदत होते.

**महाराष्ट्रातील आदिवासी वसतीगृहे**

महाराष्ट्र राज्यातही आदिवासी बहुसंख्येने राहत असून आदिवासी लोकसंख्येच्या दृष्टिने महाराष्ट्राचा देशात दुसरा क्रमांक लागतो. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्या १,०५,१०,२१३ असून राज्याच्या एकूण लोकसंख्येशी त्याचे प्रमाण १०.१ टक्के एवढे आहे.[६] महाराष्ट्रात एकूण ४५ अनुसूचित जमाती आहेत. राज्यातील धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, पालघर व ठाणे (सहयादी प्रदेश) तसेच चंद्रपूर,गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, अमरावती व यवतमाळ (गोंडवन प्रदेश) या पूर्वेकडील वनाच्छादित जिल्हयांमध्ये आदिवासींची संख्या मोठया प्रमाणात आहे. राज्यात एकूण २९ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये असून त्यापैकी ११ एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालये अतिसंदवेदनशील म्हणून घोषित करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये नाशिक, कळवण, तळोदा, जव्हार, डहाणू, धारणी, किनवट, पांढरकवडा, गडचिरोली, अहेरी व भामरागड यांचा समावेश आहे.[७] अशा प्रकारे महाराष्ट्राच्या विविध भागात आदिवासी जमातींचे वास्तव्य आहे. आदिवासी अतिशय दुर्गम वनाच्छादित भूभाग व डोंगर दऱ्या कपारित राहतो. याभागात विरळ लोकवस्ती असल्याने त्या भागात शैक्षणिक संकुले उभारणे शासनाला परवडणारे नसते. अशा वेळी दोन चार वस्त्यांसाठी एक शाळा उभारून त्याठिकाणी आदिवासींना शिक्षण दिले जाते. मात्र उच्च शिक्षणासाठी त्यांना शहरी भागात जावे लागते. अशा वेळी आदिवासी मुलांसाठी असलेल्या वसतीगृह योजनेच्या माध्यमातून त्यांना निवासाची सुविधा उपलब्ध करून त्यांना शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते.

महाराष्ट्रात आदिवासी विकास विभागाने १९८४–८५ पासून स्वतंत्ररित्या शासकीय आदिवासी वसतिगृह योजना सुरू केली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन, वैद्यकीय व अभियांत्रिकी शिक्षण घेता यावे, याकरिता राज्यात तालुका आणि जिल्हा पातळीवर ६१ हजार ७० प्रवेश क्षमता असलेली एकूण ४९५ वसतिगृहे मंजूर करण्यात आली आहेत. यापैकी ४९१ वसतीगृहे कार्यरत असून यात २८३ वसतिगृहे मुलांची तर २०८ वसतीगृहे मुलींची आहेत. आजच्या स्थितीला या वसतिगृहांची प्रवेश क्षमता ही ५८,४९५ इतकी आहे.[८] आदिवासींची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता त्यांना उच्च शिक्षणावर खर्च करणे शक्य होत नाही परिणामी बहुतांश आदिवासी मुले शालेय स्तरावरच शिक्षण सोडतात अशा मुलांच्या उच्च

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

शिक्षणासाठी वसतीगृह योजना ही संजीवनी ठरत आहे. आदिवासी कुटुंबाच्या आर्थिक गरजा लक्षात घेता या वसतीगृहात व्यावसायिक अभ्यासक्रम घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाते.

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्या सन २०१८—१९ या शैक्षणिक वर्षासाठी राज्यातील सर्व प्रकल्प कार्यालया अंतर्गत येणाऱ्या आदिवासी वसतीगृहात प्रवेशासाठी एकूण १,९७,७०२ अर्ज आले होते.[९] मात्र वसतीगृहातील प्रवेश क्षमतेनुसार केवळ ५८,४९५ मुलांचीच व्यवस्था या वसतीगृहात होऊ शकते. म्हणजेच १,३९,२०७ मुलांना वसतीगृहात प्रवेश मिळू शकत नाही. वसतीगृहात प्रवेश देतांना विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेनुसार त्यांना प्रवेश दिला जातो. म्हणजेच ज्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक पार्श्वभूमी सुमार आहे अशांना प्रवेश नाकारून एक प्रकारे उच्च शिक्षणाचेही दारे बंद केली जातात की काय असा प्रश्न निर्माण होतो. जी वसतीगृह योजना आदिवासी मुलांच्या शैक्षणिक समावेशासाठी उपकारक असायला पाहिजे ती मर्यादित प्रवेश क्षमतेमुळे शैक्षणिक समावेशनासाठी अपूरी ठरत आहेत.

२०२०—२१ मध्ये महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीच्या मुलांचा उच्च शिक्षणातील GER (Gross Enrollment Ratio) हा केवळ १७.२ इतका होता. म्हणजेच १८ ते २३ वर्षे वयोगटातील आदिवासी मुलांपैकी केवळ १७.२ टक्के मुलेच उच्च शिक्षणात येतात.[१०] हे प्रमाण अतिशय कमी असून त्यातच सर्वच आदिवासी मुलांना पुढील शिक्षणासाठी वसतीगृहाची सुविधा उपलब्ध झाली नाही तर ते शिक्षण प्रवाहातून बाहेर फेकल्या जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून शासकीय आदिवासी वसतीगृहांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी केंद्र व राज्य शासनाने भरीव आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे.

**वसतीगृहातील प्रश्न/समस्या**

आदिवासी मुलांना सुलभ रितीने शिक्षण घेता यावे व त्यांचा शैक्षणिक विकास घडवून यावा यासाठी वसतीगृह योजना राबविली जाते. परंतु सर्वच आदिवासी गरजू विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होतांना दिसत नाही. शिवाय योजना अंमलबजावणीतील त्रुटींमुळेही योजनेची उद्दिष्टये साध्य करण्यात अडचणी येतात. बहुतांश वसतीगृहात मुलभूत सोयी सुविधांचा अभाव असतो त्याचा परिणाम वसतीगृहातील प्रवेशित मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर होतो. वसतीगृहात मुलभूत सुविधांचा दर्जा सुमार असलेला दिसतो. काही वसतिगृहाच्या इमारती मोळकळीस आल्या असून त्यांच्या डागडूजीची गरज आहे.बहुतांश वसतीगृहात ग्रंथालयात पुरेशी पुस्तके नाहीत, डायनिंग रूम व टेबल, फोन सुविधा, गरम पाण्याची सुविधा पुर्ण क्षमतेने सुरू असलेल्या दिसत नाहीत. काही वसतीगृहाचा जेवणाचा दर्जा सुमार असलेला दिसतो. बरेचदा या वसतीगृहांना शासनातर्फे अनुदान वेळेवर मिळत नाही. त्यामुळे या वसतीगृहात मुलभूत सोयी सुविधा पुरवणे शक्य होत नाही. शासकीय वसतीगृहातील अशा समस्यांमुळे वसतीगृह उभारणीच्या उद्दिष्टांना आळा बसतो आहे.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

वसतीगृहातील समस्यांच्या निर्मुलनासाठी काही ठोस कृती कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी शासकीय आदिवासी वसतीगृहांची वेळोवेळी उच्च अधिकाऱ्यांकडून तपासणी झाली पाहिजे व प्रत्येक वेळी वसतीगृहात आवश्यक त्या सोयी सुविधा आहेत किंवा नाही याची खात्री केली पाहिजे. बहुतांश आदिवासी वसतीगृहात आवश्यक मनुष्यबळ नसते, पुरेशा मनुष्यबळा अभावी वसतीगृहावर प्रशासकीय नियंत्रण ठेवणे कठिण जाते त्यामुळे आवश्यक त्या प्रशासकीय मनुष्यबळाची त्वरीत भरती करणे आवश्यक आहे.

**सारांश**

शासकीय आदिवासी वसतीगृह योजना ही आदिवासी मुलांच्या शैक्षणिक समावेशनासाठीची एक महत्वपूर्ण योजना आहे. मात्र वसतीगृहातील मुलभूत सुविधांचा अभाव तसेच अल्प प्रवेश क्षमता यामुळे बऱ्याच आर्थिक दृष्टया दुर्बल आदिवासी मुलांना उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे. कारण माध्यमिक स्तरापर्यंत विविध आश्रमशाळांमधून त्याला शिक्षण घेता येते मात्र उच्च शिक्षणासाठी तालुका किंवा जिल्हयाच्या ठिकाणी जाऊन शिक्षण घ्यावे लागते. अशा ठिकाणी निवासाचा व शिक्षणाचा खर्च भरपूर असतो जो उदरनिर्वाहाची भ्रांत असणाऱ्या बहुतांश आदिवासी विद्यार्थ्यांना पेलवत नाही. तसेच अल्प गुणवत्ता असल्यास वसतीगृहातही प्रवेश मिळत नाही परिणामी त्यांना उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. म्हणून वसतीगृह निर्मितीवर अधिक भर देऊन सर्व आदिवासी मुलांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिल्यास त्यांना मुख्य शैक्षणिक व सामाजिक प्रवाहात सामावून घेता येईल.

## संदर्भ सूची

*आदिवासी लोकसंख्या https://trti.maharashtra.gov.in/index.php/en/statewise-total-tribal-population*

*Kaur, Shminder (2016) 'Inclusive Education or socially Disadvantaged' Article published in University New, 54(4) January 25-31, p.16.*

*Annual Report – 2020-21, Ministry of Tribal Affairs, Government of India, https://tribal.nic.in/downloads/statistics/AnnualReport/AREnglish2021.pdf , page no 36*

*Annual Report – 2020-21, Ministry of Tribal Affairs, Government of India, https://tribal.nic.in/downloads/statistics/AnnualReport/AREnglish2021.pdf, page no. 40*

*http://mhrd.gov.in/*

*Scheduled Tribe Population - Census 2011- https://www.census2011.co.in/scheduled-tribes.php*

*https://tribal.maharashtra.gov.in*

*https://maharashtratimes.com/career/career-news/tribal-students-are-still-waiting-for-hostel-admission/articleshow/83234761.cms*

*https://etribal.maharashtra.gov.in/evikas/eVikasDashboard/HA_ProfileUpdateDashboard.aspx*

*Annual Report – 2020-21, Ministry of Tribal Affairs, Government of India, https://tribal.nic.in/downloads/statistics/AnnualReport/AREnglish2021.pdf, page no. 40*

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*